# जाहीरात

जलयुक्त् शिवार अभियानाबाबत ग्रामीण भागातील जनतेमध्ये प्रचार व प्रसिद्धीच्या माध्यमातुन व्यापक जाणीव जागृती करण्याच्या अनुषंगाने फिरत्या वाहनाच्या (मोबाईल व्हॅन) माध्यमातुन उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्याकरीता अमरावती जिल्ह्यांतर्गत प्रचार व प्रसिद्धी करण्यासाठी 5 मोबाईल व्हॅनची वाहनचालकासह आवश्यकता आहे. सदरचे वाहन Pick up व्हॅन या वाहनासारखे असावेत. सदर व्हॅनसोबत माईक, स्पीकर, टीव्ही/एलसीडी, प्रोजेक्टर, डीव्हीडी प्लेयर, नरेगा व जलसंधारणाशी संबंधित शॉर्टफिल्म्स, शैक्षणिक फिल्म्, व्हिडिओ जिंगल्स्, ऑडिओ जिंगल्सच्या सीडीज तसेच, लघु प्रदर्शन आयोजित करण्यासाठी लागणारे साहित्य् व नरेगा आणि जलयुक्त् शिवार अभियानासंबंधिचे इतर प्रसिद्ध साहित्य् राहणार आहे. शासन निर्णय क्रमांक: पाविच-2014/प्र.क्र.56/जल 8, दि. 20 मार्च, 2015 अन्वये ठरवुन दिल्याप्रमाणे मोबाईल व्हॅनचे भाडे (मेंटेनन्स्, टोल, इंधन इ. सह) रु.30,000/- प्रति महिना एवढे राहणार असुन वाहन 1 महिन्याच्या कालावधिकरीता भाड्याने घेण्यात येणार आहे.

करीता इच्छुकांनी आपल्या निवीदा वाहतुक विभागाचे आवश्यक परवान्यासह व आवश्यक कागदपत्रासह दि.08/04/2015 रोजी दु.3.00 वाजेपर्यंत किंवा त्यापुर्वि उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती परिसर कॅम्प्, अमरावती येथे सादर करावयात. त्यानंतर आलेल्या निवीदांचा विचार करण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी. निवीदा दि.08/04/2015 रोजी सायंकाळी 5.00 वाजता उघडण्यात येतील. यासंबंधी सविस्त्र माहिती आवश्यक असल्यास संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा.

**जिल्हाधिकारी अमरावती**